दि. १०/०५/२०२३

म. टा. पा. नं. १

# पाकिस्तानात आगडोंब

## इम्रान खान यांच्या अटकेनंतर अनेक शहरांमध्ये जाळपोळ

**वृत्तसंस्था, इस्लामाबाद/लाहोर**

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान व पाकिस्तान तेहरिक ए इन्साफ पक्षाचे (पीटीआय) सर्वेसर्वा इम्रान खान यांना मंगळवारी इस्लामाबाद उच्च न्यायालयाबाहेर कमालीच्या नाट्यपूर्णच अटक करण्यात आली. निमलष्करी दलाच्या जवानांनी बळाचा वापर करत इम्रान यांना ताब्यात घेतले. भ्रष्टाचारासंबंधी एका खटल्याच्या सुनावणीसाठी इम्रान हे न्यायालयात आले होते, त्यावेळी ही कारवाई करण्यात आली. या अटकेनंतर इस्लामाबाद, लाहोर, पेशावर, मुलतान, गुजरनवाला, हफिजाबाद, गुजरात शहरांमध्ये 'पीटीआय' कार्यकर्त्यांनी हिंसक आंदोलन सुरू केले.

पाकिस्तानी लष्कराने माझी हत्या करण्याचा कट आखला आहे, असा गंभीर आरोप इम्रान यांनी सोमवारी केला होता. त्यानंतर लगेचच मंगळवारी ७० वर्षीय इम्रान यांना जमीन व्यवहार प्रकरणात अटक झाल्याने देशातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. आयएसआयच्या वरिष्ठ अधिकाऱ्यावर इम्रान यांनी केलेले आरोप हे बिनबुडाचे आहेत, असे पाकिस्तानी लष्कराने सोमवारी म्हटले होते. भ्रष्टाचाराच्या एका खटल्याच्या सुनावणीसाठी इम्रान हे लाहोरहून इस्लामाबाद येथे मंगळवारी दाखल झाले. 'न्यायालयात जाण्यासाठी इम्रान हे बायोमेट्रिक प्रक्रियेची पूर्तता करत असतानाच निमलष्करी दलाचे रेंजर्स खिडकीच्या काचा फोडून आत शिरले व त्यांनी काही वकील व इम्रान यांच्या सुरक्षारक्षकांना मारहाण केली', असे इम्रान यांच्या पाकिस्तान पीटीआय पक्षाने म्हटले आहे. यानंतर या रेंजर्सनी इम्रान यांना बखोटीला धरून नेले व पोलिसांच्या गाडीत बसवले, असे सीसीटीव्ही फूटेजमध्ये दिसत आहे.

इम्रान यांच्या अटकेच्या वृत्तास नॅशनल अकाउंटेबिलिटी (पान ७वर)



निमलष्करी जवानांच्या गराड्यात इम्रान खान.




### ५४ कोटींच्या गैरव्यवहाराचे प्रकरण

देशद्रोहासारख्या गंभीर आरोपांचा सामना करणाऱ्या इम्रान खान यांना अटक मात्र अल कादिर ट्रस्टच्या भूखंड व्यवहारप्रकरणात झाली आहे. याप्रकरणात इस्लामाबाद पोलिसांनी निवेदन प्रसिद्धीस दिले. यानुसार खान, त्यांची पत्नी बुशरा बिबी यांच्या अधिपत्याखालील या ट्रस्टला भूखंड देण्याच्या व्यवहारातून गैरमार्गाने अर्थलाभ मिळवल्याचा आरोप आहे. पंजाब प्रांताच्या झेलम जिल्ह्यातील सोहावा या भागात सन २०१९मध्ये या ट्रस्टला सुफी अभ्यासक्रम शिकवणारी अल कादिर विद्यापीठ उभारण्यासाठी सरकारकडून ५४ कोटी पाकिस्तानी रुपये मूल्याची जमीन देण्यात आली. या भूखंडाचे क्षेत्रफळ ४५८ कनाल (१ कनाल=५०६ चौ. मीटर) इतके होते. हा व्यवहार करणाऱ्या कंपनीकडून खान यांनी हा आर्थिक लाभ पदरात पाडून घेतल्याचा आरोप आहे. खान, बुशरा बिबी यांच्यासह पाकिस्तान तेहरिक ए इन्साफ पक्षाच्या अन्य काही नेत्यांनाही आर्थिक लाभ झाल्याचा संशय आहे. तसेच या व्यवहारामुळे सरकारी तिजोरीचे ५० अब्ज पाकिस्तानी रुपयांचे नुकसान झाल्याचेही तपास यंत्रणांचे म्हणणे आहे.

म. टा. पु. पा. नं. १

# लाचखोर पोलिस शिपायांवर कारवाई

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

एक सहकारी पोलिस कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय देयक व वेतनाच्या फरकाची रक्कम मंजूर करण्यासाठी लाचेची मागणी केल्याने मिरा-भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयात कार्यरत असणाऱ्या दोन पोलिस शिपायांवर मंगळवारी कारवाई करण्यात आली. या प्रकरणात एका शिपायाला अटक करण्यात आली आहे. पालघर लाचलुचपत विभागाकडून ही कारवाई करण्यात आली.

मिरा-भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयाकडे एका पोलिस कर्मचाऱ्याने वैद्यकीय देयकाची रक्कम व सातव्या वेतन आयोगातील फरकाची रक्कम मिळावी, यासाठी अर्ज केला होता. या कामासाठी पोलिस आयुक्तालयात शिपाईपदावर कार्यरत असणाऱ्या संजय पवार व गणेश वाघेरे यांनी १५०० रुपयांच्या लाचेची मागणी एप्रिल महिन्यात केली होती. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्याने याची तक्रार पालघर लाचलुचपत विभागाकडे केली होती. त्यानुसार, मंगळवारी लाचलुचपत विभागाने सापळा रचून केलेल्या पडताळणीत त्यांनी पैशांची मागणी केल्याचे निदर्शनास आले. पवार हे सुट्टीवर असल्याने वाघेरे यांना अटक करण्यात आली. या प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती लाचलुचपत विभागाकडून देण्यात आली.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. १०/०५/२०२३

म. टा. पा. न. १

# उ. प्रदेश, उत्तराखंडमध्ये 'केरला स्टोरी' करमुक्त



उपमुख्यमंत्री देवेंद्र पडणवीस यांनी मंगळवारी नागपुरातील 'व्हीआर मॉल'मध्ये 'द केरला स्टोरी' चित्रपट पाहिला.

वृत्तसंस्था, लखनऊ

मध्य प्रदेश सरकारने 'द केरला स्टोरी' हा चित्रपट करमुक्त केल्यानंतर, इतरही भाजपशासित राज्ये पुढे सरसावली असून, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मंगळवारी हा चित्रपट करमुक्त करण्याचा निर्णय जाहीर केला. पाठोपाठ उत्तराखंडच्या सांस्कृतिकमंत्र्यांनीही असाच निर्णय घेण्याची घोषणा केली.

'द केरला स्टोरी' चित्रपट समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचा ठपका ठेवत सोमवारी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घातली होती. तर सत्ताधारी द्रमुकच्या विरोधामुळे तमिळनाडूमध्येही

## प. बंगालच्या बंदीला भाजपशासित राज्यांचे प्रत्युत्तर

रविवारपासून अनेक ठिकाणी या चित्रपटाचे प्रदर्शन बंद आहे. विरोधकांची सरकारने असलेल्या राज्यांच्या या पवित्र्यानंतर भाजपशासित राज्यांनी या चित्रपटाच्या बाजूने उभे राहण्याचा निर्धार केल्याचे चित्र मंगळवारी दिसून आले. मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी अधिकृत हँडलवरून केलेल्या ट्वीटमध्ये, 'केरला स्टोरी उत्तर प्रदेशमध्ये करमुक्त केला जाईल,' असे म्हटले आहे. आदित्यनाथ त्यांच्या मंत्रिमंडळासह १२ मे रोजी या चित्रपटाचा विशेष खेळ (पान ८वर)

म. टा. पा. न. ८

# उ. प्रदेश, उत्तराखंडमध्ये 'केरला स्टोरी' करमुक्त

(पान एकवरून)



पाहणार असल्याचेही सरकारतर्फे जाहीर करण्यात आले. समाजवादी पक्षाने या निर्णयावर टीका केली असून, 'राज्य सरकारने विषारी अजेंडा लादण्यासाठी चित्रपट आणि साहित्याचा आधार घेऊ नये', असे म्हटले आहे. समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस शिवपाल सिंह यादव यांनीही, 'मनोरंजनासाठी मनोरंजन असले पाहिजे. तुमचा विषारी अजेंडा देशावर लादण्यासाठी सिनेमा आणि साहित्याचा वापर करू नका. द्वेषाच्या गर्भातून निर्माण होणारी कोणतीही कला राष्ट्र आणि समाजासाठी विनाशकारी असेल,' असे ट्वीट केले.

## याचिकेवर १५ मे रोजी सुनावणी

**नवी दिल्ली :** 'द केरला स्टोरी' या वादग्रस्त चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती देण्यास नकार देणाऱ्या केरळ उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधातील याचिकेवर सर्वोच्च न्यायालय १५ मे रोजी सुनावणी घेणार आहे.. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी मंगळवारी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि न्या. पी. एस. नरसिंह यांच्या खंडपीठासमोर या याचिकेची प्राथमिक माहिती दिली. या प्रकरणी उच्च न्यायालयाने आदेश दिला आहे का, अशी विचारणा खंडपीठाने केली असता, सिब्बल यांनी चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती देण्यास नकार दिल्याचे सांगितले. त्यानंतर खंडपीठाने, आम्ही या याचिकेवर सोमवारी (१५ मे) सुनावणी घेऊ, असे सांगितले.

## 'निर्मात्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा'



**ठाणे :** ''द केरला स्टोरी' चित्रपटाचा टीझर पाहा; त्यातून निर्माता खोटी माहिती देशभर पसरवत आहे. त्यामुळेच त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला पाहिजे', अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मंगळवारी केली. या चित्रपटाबाबत आव्हाड यांनी ठाण्यात पत्रकार परिषद घेऊन भूमिका स्पष्ट केली. 'देशात धार्मिक तेढ निर्माण करण्यात धन्यता मानली जात आहे. लोकांच्या मनात द्वेष निर्माण केला जात आहे', असे आव्हाड म्हणाले. 'कोण मोफत सिनेमा दाखवतो, याच्याशी आपणाला देणेघेणे नाही', असेही ते म्हणाले.

CamScanner

Scanned with CamScanner

दि. १०/०५/२०२३

म.टा.पु.पा.नं. १

# कोळीवाड्यात क्लस्टर नको!




मिरा-भाईंदर : मिरा-भाईंदरमध्ये राबवल्या जाणाऱ्या क्लस्टर योजनेसंदर्भातील (सामूहिक विकास योजना) अधिसूचना नुकतीच पालिकेकडून जाहीर करण्यात आली आहे. यात काही कोळीवाड्यांचाही समावेश करण्यात आल्याने कोळीवाड्यात राहणाऱ्या नागरिकांकडून या योजनेला तीव्र विरोध केला जात आहे. यासंदर्भात त्यांनी आयुक्तांना पत्रही दिले आहे. या पार्श्वभूमीवर क्लस्टरसंदर्भात नागरिकांनी 'मटा'कडे तीव्र प्रतिक्रिया नोंदवल्या.

## किनाऱ्यापासून मच्छिमार दूर राहणे अशक्य



क्लस्टर योजना कोळीवाड्यात राबविणे म्हणजे माशांना पाण्यापासून दूर करण्यासारखे आहे. कोळीवाड्यात मच्छिमार राहत असून त्यांच्या बोटी, जाळी, मासेमारीसाठी लागणारी सामग्री ठेवण्याकरिता अधिक जागा लागते. तीसुद्धा किनाऱ्यालगत असायला हवी. – रेनॉल्ड बेचरी, चेअरमन, भाटे बंदर मच्छिमार सहकारी सोसायटी

## बिल्डर लॉबीची धन



हा निर्णय बिल्डर लॉबीसाठी घेण्यात आला आहे. हा निर्णय मुंबई व उपनगराचे मूळ मालक असलेला कोळी, आगरी, भंडारी यांना देशोधडीला लावणारा आहे. शहरातील बेकायदा परप्रांतीयांसाठी केलेली ही योजना भूमिपुत्रांवर थोपवणे म्हणजे घरमालकाला घराबाहेर काढल्यासारखे आहे.

– शर्मिला बगाजी, माजी नगरसेविका, उत्तन

## कोळी बांधवांची फसवणूक



मच्छिमार त्यांच्या राहत्या घराच्या व मासळी सुकवण्याच्या जागा त्यांच्या नावे कराव्या, म्हणून पाठपुरावा करत आहेत. मच्छिमारांच्या ताब्यात असलेल्या जमिनीचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. असे असताना क्लस्टर ही फसवणूक आहे.

– बर्नड डिमेलो, कार्याध्यक्ष, अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती

## झोपडपट्टीधारकांसाठी योजना



ही योजना बेकायदा पद्धतीने उभारण्यात आलेल्या झोपडपट्टीधारकांसाठी आहे. ही योजना अनेक मजल्यांची घरे असणाऱ्या गावठाण व कोळीवाड्यांत राबवणे अयोग्य आहे. अशा योजना स्थानिक भूमिपुत्रांवर थोपवण्यापेक्षा त्यांच्या घराच्या जमिनी त्यांच्या नावावर करून द्याव्यात.

– विल्यम गोविंद, मच्छिमार संस्थेचे पदाधिकारी

लोकसत्ता पु.पा.न. १

# बेकायदा वाळू उपशावर सलग पाच दिवस कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी



वसई : बेकायदा वाळू उपशाविरोधात महसूल विभागाने कारवाई अधिक तीव्र केली आहे. सलग पाच दिवस वैतरणा, शिरगाव, नारिंगी या खाडीत कारवाई करून २० बोटी व १२ सक्शन पंप स्फोटाच्या साहाय्याने नष्ट केले आहेत.

वसई विरार भागातील समुद्रकिनारपट्टीच्या भागात व खाडीत मोठ्या प्रमाणात छुप्या मार्गाने बेकायदा वाळू उपसा केला जातो. या होत असलेल्या अनिर्बंध वाळू उपशामुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे.

तसेच हा वाळू उपसा थांबला पाहिजे यासाठी मुंबई उच्च न्यायालयात २०१४ साली याचिका दाखल करण्यात आली होती. या सुनावणीदरम्यान (पान ४ वर)

लोकसत्ता पु.पा.न. ४

# बेकायदा वाळू उपशावर सलग पाच दिवस कारवाई

(पान १ वरून) होणारा वाळू उपसा थांबवण्यासाठी विविध उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. त्याच अनुषंगाने वसईच्या महसूल विभाग, पोलीस प्रशासन, मेरिटाइम बोर्ड यांच्यातर्फे कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

सलग पाच दिवस वसईचे प्रांताधिकारी शेखर घाडगे व तहसीलदार अविनाश कोष्टी व त्यांच्या पथकाने कारवाई करीत वैतरणा, शिरगाव, नारिंगी येथे सुमारे २० बोटी गॅस कटरच्या साहाय्याने तोडल्या आहेत. १२ सक्शन पंप जिलेटिन स्फोट घडवून नष्ट करण्यात आल्या आहेत.

काही ठिकाणी कारवाईदरम्यान अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र पोलीस उपयुक्त सुहास बावचे यांच्या मार्गदर्शनाखाली मांडवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रफुल्ल वाघ यांच्यासह ४० पोलीस अंमलदार व अधिकारी बंदोबस्तासाठी ठेवले होते.

CamScanner
Scanned with CamScanner

दि. १०/०४/२०२३

लोकसत्ता पा. नं. ९

# आफताबवर आरोप निश्चित

## १ जूनपासून खटल्याची पुढील प्रक्रिया

पीटीआय, नवी दिल्ली



श्रद्धा वालकर हत्या प्रकरण

आपली 'लिव्ह इन पार्टनर' श्रद्धा वालकर हिचा गळा दाबून खून करून नंतर तिच्या मृतदेहाचे तुकडे केल्याप्रकरणी दिल्ली न्यायालयाने मंगळवारी आफताब अमीन पूनावाला याच्याविरुद्ध खून आणि पुरावे नष्ट करण्याचे आरोप निश्चित केले. त्यामुळे आता आफताबवर खटला चालवण्यात येईल. या खटल्यातील पुढील प्रक्रिया १ जूनपासून करण्यात येईल.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश मनीषा खुराना कक्कर यांनी सांगितले, की या प्रकरणी सुनावणीत दोन्ही बाजूंनी सविस्तर युक्तिवाद ऐकण्यात आला. फिर्यादी सरकारी पक्षाने आरोप निश्चित करून खटला चालवण्यासाठी पुरेशी सामुग्री उभी केली आहे. आरोपीविरुद्ध प्रथमदर्शनी भारतीय दंड संहितेतील कलम ३०२ (हत्या), २०१ (गुन्ह्यातील पुरावे नष्ट करणे) या कलमांतर्गत आरोप निश्चित करण्यात आले आहेत. या दोन कलमांतर्गत खटला चालवण्याइतपत साक्षी-पुरावे फिर्यादी सरकारी पक्षातर्फे उभे करण्यात आले आहेत.

त्यानंतर न्यायाधीशांनी आफताबवरील आरोप वाचून दाखवले. त्यानुसार आफताबने गेल्या वर्षी १८ मे रोजी श्रद्धा वालकर हिचा खून केला. त्यानंतर तिच्या मृतदेहाचे तुकडे करून १८ ते २२ मे दरम्यान विविध ठिकाणी त्यांची विल्हेवाट लावल्याचे आरोप आहे. हे आरोप त्याला समजले आहेत का, अशी विचारणा न्यायालयाने केली. त्यावर आफताबने होकारार्थी उत्तर दिले. परंतु हे आरोप नाकारत आपण दोषी नसल्याचे स्पष्ट करून आफताबने खटल्याला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

दिल्ली पोलिसांनी २० मार्च रोजी आरोपांवरील युक्तिवाद पूर्ण करताना न्यायालयाला सांगितले होते, की या प्रकरणी विश्वासार्ह आणि भक्कम पुराव्यांद्वारे आरोपीचा या गुन्ह्याशी संबंध सिद्ध करण्याइतपत या गुन्ह्यातील घटनाक्रम सिद्ध करता येईल. २१ फेब्रुवारी रोजी न्यायदंडाधिकाऱ्यांनी या आरोपपत्राची दखल घेत हे प्रकरण सत्र न्यायालयात सोपवले होते.

लोकमत पा. नं. ४

# पोलिसाकडेच मागितली लाच, पोलिसाला अटक

## वैद्यकीय देयक मंजुरीसाठी मागितले दीड हजार

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयातील दोघा पोलिसांनी एका पोलिस कर्मचाऱ्याकडून सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम आणि वैद्यकीय देयक मंजुरीसाठी दीड हजारांची लाच मागितल्याप्रकरणी एका पोलिसाला मंगळवारी अटक करण्यात आली. याप्रकरणी काशीमीरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिस आयुक्तालयातील वरिष्ठ लिपिक संजय पवार (४६) व लिपिक गणेश वाघेरे (३२) हे पोलिस कर्मचाऱ्यांची वेतन फरक रक्कम, वैद्यकीय देयक आदींचे प्रस्ताव तयार करून ते कोषागार कार्यालयात सादर करतात. एका पोलिस कर्मचाऱ्याने सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम मिळण्यासाठी, तसेच वैद्यकीय बिल मंजुरीकरिता अर्ज केला होता. त्यांच्याकडे पवार आणि वाघेरे यांनी



त्या अर्जदार कर्मचाऱ्याकडे देयक कार्यालयात सादर करण्याकरिता दीड हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. याप्रकरणी पोलिस कर्मचाऱ्याने ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती.

पोलिस अधीक्षक सुनील लोखंडे व अपर पोलिस अधीक्षक अनिल घेरडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक नवनाथ जगताप यांनी पर्यवेक्षण अधिकारी म्हणून काम पाहिले. तक्रारीत तथ्य आढळल्याने पोलिस निरीक्षक स्वप्न बिश्वाससह अमित चव्हाण, सखाराम दोडे यांच्या पथकाने मंगळवारी पोलिस आयुक्तालयातून वाघेरे याला अटक केली. पवार याचा शोध सुरू आहे.

लोकसत्ता पु. पा. क्र. १

# भररस्त्यात बिघाडाने अडकलेली वाहने अपघातांना कारणीभूत

लोकसत्ता प्रतिनिधी

वसई: मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर विविध प्रकारच्या तांत्रिक बिघाडामुळे वाहने बंद पडतात. मात्र ही बंदवाहने प्राधिकरणाकडून वेळीच बाजूला केली जात नसल्याने अपघाताला कारणीभूत ठरू लागली आहेत.

वसई पूर्वेच्या भागातून मुंबई व गुजरात या भागांना जोडणारा मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. या मार्गावरून दररोज मोठ्या संख्येने वाहनांची वर्दळ असते. परंतु काही वेळा महामार्गावर, विविध ठिकाणच्या भागात वाहने तांत्रिक



बिघाड होऊन रस्त्याच्या मध्येच बंद पडतात. बंद पडलेली वाहने ही वेळीच रस्त्याच्या मधून बाजूला करणे गरजेचे आहे. परंतु अशी वाहने बाजूला करण्यासाठी महामार्गावर तातडीने कोणतीच यंत्रणा उपलब्ध नाही.

बहुतांश वेळा ही वाहने महामार्गाच्या पहिल्या किंवा मधल्या वाहिनीवर असतात त्यामुळे भरधाव वेगाने प्रवास करणाऱ्या वाहनांस बंद पडलेली वाहने दिसून येत नसल्याने अपघात होतात. विशेषतः रात्रीच्या सुमारास अंधारात ही वाहने पटकन दिसून येत नाहीत त्यामुळे बंद वाहनांना धडका लागून अपघात होण्याच्या घटना घडल्या आहेत.

जेव्हा एखादे वाहन बंद पडते तेव्हा ते क्रेनच्या साहाय्याने तातडीने बाजूला करणे आवश्यक आहे. तशी कोणतीच व्यवस्था प्राधिकरणाकडून होत नसल्याने तासन्तास ही वाहने जागच्याजागीच दुरुस्त होईपर्यंत उभी असतात. याचा फटका इतर वाहनचालकांना बसू लागला आहे.

CS CamScanner
Scanned with CamScanner

दि. १०/०५/२०२३

लोकमत पु. पा. नं. १

# फास बसेपर्यंत वाट पाहणार का?


## मीरा-भाईंदरमध्ये विविध केबलच्या जाळ्यांनी शहर विद्रूप, अपघात घडण्याची शक्यता

धीरज परब
लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर शहराचा स्वच्छता अभियानामध्ये वरचा क्रमांक लागावा, म्हणून महापालिका शहरात रंगरंगोटी, भिंतीचित्रे, साफसफाई आदींसाठी कोट्यवधी रुपये खर्च करत आहे, मात्र शहरात विविध केबलच्या जाळ्यांनी शहर विद्रुप झाले असून अशा केबलमुळे अपघात घडण्याची शक्यता मोठी आहे. शहरातील केबलचे जाळे जे खासगी लोकांचे आहे, तसेच सरकारी उपक्रमांचेदेखील आहे, परंतु नियम हे सर्वांनाच सारखे असले पाहिजेत शिवाय लोकांच्या जीवाला धोका होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

### कुणी घेतली परवानगी?

महापालिका अधिकाऱ्याच्या सांगण्यानुसार बहुतांश केबल चालक-मालक महापालिकेची परवानगी न घेताच बेकायदेशीर केबल टाकत असतात. नेमकी आकडेवारी संबंधित अधिकाऱ्याकडे नसली, तरी काही मोजक्याच लोकांनी परवानगी घेतल्याचे सांगण्यात आले.



काशिमीरा नाका येथील राष्ट्रीय महामार्गावरून गेलेले केबलचे जाळे.

### वाहनचालकांनो, या ठिकाणी सांभाळा

काशीमीरा नाका परिसर हा केबलच्या जंजाळात अडकलेला आहे. या ठिकाणी वाहने सातत्याने धावत असल्याने एखादी केबल खाली आल्यास वा तुटून पडल्यास अपघात घडू शकतो. शहरातीलअनेक नाके आणि रहदारीचे रस्ते हे वरून कशाही टाकलेल्या केबलमुळे धोकादायक बनले आहेत.

### सौंदर्यीकरणाला केबलचा फास

- शहरात गल्लीबोळापासून मुख्य रस्ते, नाके, रेल्वेस्थानक परिसरापासून जवळपास सर्वच सार्वजनिक ठिकाणी केबलची जाळी अस्ताव्यस्त पसरलेली आहेत.
- झाडांवरून, विजेच्या खांबांवरून केबल टाकल्या जातात. त्यामुळे केबलचे जाळे शहराच्या सौंदर्याला बाधक ठरत आहे.
- मोठ्या प्रमाणात पसरलेले केबलचे जाळे नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहे.

महापालिकेची परवानगी न घेता रस्त्यावरून, झाडांच्यावरून, सार्वजनिक ठिकाणी केबल टाकणाऱ्यांच्या केबल कापण्याची कार्यवाही केली जाते. केबलचे शुल्क ठरवले असून ते वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

\- प्रशांत जानकर, कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग

लोकमत पा. नं. १०

# मुस्लीम आरक्षणाच्या मुद्द्यावर राजकीय वक्तव्य करू नका : कोर्ट

कर्नाटकातील चार टक्के मुस्लीम आरक्षण मागे घेण्यासंदर्भात प्रलंबित असलेल्या न्यायालयीन खटल्यावर नेत्यांकडून होत असलेल्या वक्तव्यावर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी तीव्र आक्षेप घेतला. या अत्यंत वादग्रस्त मुद्द्यावर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा जाहीर वक्तव्य करत असल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले असता कोर्ट म्हणाले की, प्रलंबित प्रकरणाबद्दल राजकीय भाषणबाजी अनावश्यक असून, यासाठी थोडासा विवेक राखण्याची गरज आहे.

न्यायमूर्ती के. एम. जोसेफ, न्यायमूर्ती बी. व्ही. न्यायमूर्ती नगररत्ना आणि न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह यांच्या खंडपीठाने सांगितले की, "हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, तेव्हा या मुद्द्यावर राजकीय भाषणबाजी करू नये. यावर संयम हवा".

४ टक्के मुस्लीम आरक्षण रद्द करण्याला आव्हान देणाऱ्या याचिकाकर्त्यांतर्फे ज्येष्ठ वकील दुष्यंत दवे म्हणाले की, "कर्नाटकमध्ये गृहमंत्री दररोज ४ टक्के मुस्लीम आरक्षण मागे घेतल्याचे वक्तव्य करत आहेत. अशी विधाने का करायला हवीत?

पुढारी पु. पा. नं: १

# क्रिकेट स्पर्धांचे आयोजन

वसई : वसई विरार शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने भारतीय संगणक युगाचे प्रणेते, देशाचे मा. पंतप्रधान भारतरत्न स्व. राजीव गांधी चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. अण्णासाहेब वर्तक सभागृह ट्रस्ट व विजय पाटील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि वसई विरार शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने दि. १३ व १४ मे २०२३ रोजी वसईतील नरवीर चिमाजी मैदान येथे स्व. राजीव गांधी चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे सलग दोन दिवस चालणाऱ्या या अभिनव व भव्य क्रिकेट स्पर्धेमध्ये भंडारी, आगरी, कोळी, ख्रिश्चन, आदिवासी इत्यादी प्रत्येकी ८ संघ असे मिळून एकूण ४० क्रिकेट संघ सहभाग घेत आहेत.

CS CamScanner
Scanned with CamScanner

पुढारी पु. पा. न. ३

# काँग्रेस अध्यक्ष खर्गे यांना धमकी देणाऱ्यावर गुन्हा दाखल करा

## जिल्हा काँग्रेसची वसई पोलिसात तक्रार



**वसई : पुढारी वृत्तसेवा**

काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे व त्यांच्या परिवारातील सदस्यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याने काँग्रेस पक्षाने आक्रमक पवित्र घेतला आहे. खरगे यांना धमकी देणाऱ्यावर तात्काळ गुन्हा दखल करावा, अशी लेखी तक्रार वसई विरार जिल्हा काँग्रेसतर्फे वसई पोलिसात करण्यात आली आहे.

खरगे यांना धमकी देणाऱ्या भाजपाच्या मनीकांत राठोड यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. मल्लिकार्जुन खरगे व त्यांच्या परिवारातील सदस्यांना भारतीय जनता पार्टीचे चित्तपुर कर्नाटक विधानसभेचे उमेदवार मनीकांत राठोड यांनी जीवे मारण्याची धमकी दिली आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर असून मनिकांत राठोड गुन्हेगारी प्रवृत्तीचा इसम आहे. कर्नाटकात त्याच्यावर अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे.

भारतीय जनता पार्टीचा विधानसभेचा उमेदवार राठोड हा निवडणुकीच्या काळात अखिल भारतीय काँग्रेस अध्यक्ष खरगे यांना जीवे मारण्याची धमकी देण्याचा सबळ पुरावाही सोबत जोडलेला आहे असे म्हणत भारतीय जनता पक्षाचा उमेदवार मनीकांत राठोड यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करावा अशी लेखी तक्रार जिल्हा काँग्रेसतर्फे आज (दि. ९) वसई पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत आंधारे यांना देण्यात आली आहे.

पुढारी पु. पा. नं. ३



# वसईत महिलांसाठी भाजपाचे स्क्रिनिंग

**खानिवडे :** द केरला स्टोरी या बहुचर्चित, वास्तववादी चित्रपटाचे वसईच्या महिला आणि मुलींसाठी वसईरोड भाजपा मार्फत स्पेशल स्क्रिनिंग शो के टी व्हिजन या सिनेमागृहात वसई विधानसभा प्रमुख चंद्रशेखर धुरी यांच्यामार्फत आयोजित करण्यात आला होता. मंगळवारी संध्याकाळी साडेचार वाजता आयोजित करण्यात आलेल्या या शोसाठी महिलांनी प्रचंड प्रतिसाद दिला. संपूर्ण सिनेमागृह फुल झाले होते. हा शो सुरू होण्यापूर्वी आलेल्या महिलांनी वंदे मातरम आणि भारतमाता की जय या नामाचा जयघोष करून सारा परिसर दणाणून सोडला होता. यावेळी भाजपचे पदाधिकारी जिल्हा अध्यक्ष राजन नाईक, जिल्हा महिला मोर्चा प्रमुख प्रज्ञाताई पाटील, प्रदेश महिला मोर्चा सचिव आम्रपाली साळवे, जिल्हा सचिव कांचन झा, जिल्हा उपाध्यक्ष किरण भोईर, जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष अभय कक्कर यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. आलेल्या महिलांचे स्वागत जिल्हा सचिव मॅथ्यू कोलॅसो यांनी तर सूत्रसंचालन शहर अध्यक्ष रामानुजम यांनी केले. हा शो पाहून झाल्यानंतर महिलांनी मोठा संताप व्यक्त करत प्रत्येक महिलेने व मुलींनी आवर्जून केरला स्टोरी हा चित्रपट पहिलाच पाहिजे असे आवाहन केले. तर हा चित्रपट भारतीय समाजात प्रभावी जन जागृतीचे काम करणारा आहे अश्या प्रतिक्रिया महिला देत होत्या.

पुढारी पु. पा. न. ३

# खैरतस्करावरवनविभागाची कारवाई, मुद्देमाल जप्त

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

तुंगारेश्वरच्या जंगलातून नेहमीच लाकूड चोरून नेण्याचे प्रकार घडतात. यावेळेला देखील वनविभागाला खैराची चोरी करणार्या चोरट्यांना पकडण्यात यश आले. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर सकवार येथे छुप्या मार्गाने होणाऱ्या खैराच्या जंगलातील झाडांची तोड करून चोरट्या मार्गाने पळविणाऱ्या चोरांना भाताने वनविभागाने कारवाई करून त्यांच्याकडील चोरी केलेल्या खैर लाकडांचा मुद्देमाल हस्तगत केला. यात सुमारे १५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर भाताने परिसरात दोन दिवसांपूर्वी साधारण एक ते दोन वाजेदरम्यान भाताणे वन विभाग मोबाइल स्कॉड गस्त घालत होते. याचदरम्यान सकवार भागात मुंबईच्या दिशेने जाणारा ट्रक संशयास्पद आढळून आला. वन विभागाच्या पथकाने ट्रकचा पाठलाग करून हा ट्रक अडविला त्यावेळी चप्पल तयार करण्यासाठी लागणार्या कच्च्या मालाच्या आड खैरांची तस्करी होत असल्याचे उघड झाले. ९.०४७ घनमीटर सुमारे १५ लाख रुपये किमतीचे खैराचे लाकूड जप्त करण्यात आले आहे. ट्रक हा गुजरात राज्यातून आला असून तो पनवेलकडे जाणार होता. वन विभागाने चालकाला ट्रकसह ताब्यात घेण्यात आले असून साधारण २८ लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती दिली आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. १०/०५/२०२३

पुढारी पा.न. ५

# महिला पोलीसाविरोधात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

## नयानगर पोलीस ठाण्यातील प्रकार

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नयानगर पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार प्रेमसागर वाघ यांच्या तक्रारीवरून काशीमीरा पोलीस ठाण्यात कार्यरत असणाऱ्या पोलीस महिला अंमलदार यांच्या विरोधात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाघ व संबंधित महिला पोलीस २०२१ मध्ये नवघर पोलिस ठाण्यात कार्यरत होते. त्या वेळेस महिला पोलिस यांनी नवघर पोलिस ठाण्यात प्रेमसागर वाघ यांच्या विरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल केला होता. याच गुन्ह्यात प्रेमसागर वाघ यांना निलंबित करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी त्या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन घेतला होता. तसेच तो गुन्हा चुकीचा असल्याने त्यांनी तो गुन्हा रद्द करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असून ते प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. प्रेमसागर वाघ हे २१ एप्रिल २०२२ रोजी नयानगर पोलिस ठाण्यात विभागीय चौकशी अधिकारी यांच्याकडे हजर झाले. तसेच पीडित महिला यांना देखील चौकशीसाठी बोलावले होते. त्यावेळी पीडित महिला पोलिसाने भांडण करून तुझ्यावर व तुझ्या मुलांविरुद्ध गुन्हा दाखल करेन, अशी धमकी दिल्याची अदखलपात्र तक्रार महिला पोलिसाविरोधात वाघ याने नोंदवली होती. त्यानंतर त्या महिलेने वाघ व त्यांच्या मुलाच्या विरोधात वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ईमेलद्वारे तक्रार केली. पीडितेस आपण अनुसूचित जातीचे असल्याची माहिती असूनसुद्धा खोटी तक्रार केली. त्यामुळे माझ्या कुटुंबाला मानसिक त्रास व भविष्यात धोका असल्याने नयानगर पोलिस ठाण्यात वाघ यांनी तब्बल एक वर्षानंतर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला आहे. दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या तांत्रिक बाबी तपासून संबंधितांना नोटीस देऊन त्याची चौकशी करून अधिक तपास करण्यात येणार असल्याचे तपास अधिकारी सहायक पोलीस आयुक्त विलास सानप यांनी सांगितले आहे. अर्जदार यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त तपास करत आहे. चौकशी झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल, असे जयंत बजबळे, उपायुक्त, परिमंडळ-१ यांनी सांगितले आहे.

सकाळ पा.न. ३

# 'द केरळ स्टोरी' चित्रपटाच्या क्रू मेंबरला जीवे मारण्याची धमकी



मुंबई, ता. ९ : 'द केरळ स्टोरी' चित्रपटाच्या एका क्रू मेंबरला धमकी देण्याचा प्रकार समोर आला आहे. त्यासंदर्भात चित्रपटाचे दिग्दर्शक सुदिप्तो सेन यांनी आंबोली पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे.

सेन यांनी दिलेल्या माहितीनुसार चित्रपटाच्या एका क्रू मेंबरला एका अनोळखी नंबरवरून धमकीचा मेसेज आला होता. 'मेसेजमध्ये संबंधित व्यक्तीला घरातून एकटे बाहेर न पडण्याची धमकी देण्यात आली आहे. त्यांनी 'द केरळ स्टोरी' प्रेक्षकांना दाखवून काहीही चांगले केले नाही, असा उल्लेखही होता,' असे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी क्रू मेंबरला सुरक्षा पुरवली असून प्राथमिक चौकशी करून पुढील कारवाई करणार असल्याची माहिती दिली. पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस सरकारने राज्यात शांतता राखण्यासाठी आणि द्वेष व हिंसाचाराच्या घटना टाळण्यासाठी 'द केरळ स्टोरी'वर बंदी घातली आहे. चित्रपटाचे निर्माते विपुल अमृतलाल शहा म्हणाले, 'जर पश्चिम बंगालच्या राज्य सरकारने आमचे म्हणणे ऐकले नाही, तर आम्ही कायदेशीर मार्ग शोधू.'

पुढारी पा. नं. ८

# कर्नाटकात तूर्त नवे मुस्लिम आरक्षण लागू होणार नाही

**पान १वरून :** कुठलाही प्रवेश अथवा नियुक्ती दिली जाणार नाही, असे आश्वासन राज्य सरकारने न्यायालयाला दिले. मुस्लिमांचे आरक्षण रद्द करीत सरकारने प्रत्येकी दोन टक्के आरक्षण वोक्कलिंग तसेच लिंगायत समाजाला देण्याचा निर्णय घेतला आहे. न्यायमूर्ती के. एम. जोसेफ आणि न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांचे खंडपीठ याप्रकरणी सुनावणी घेत आहे.

ओवीसी श्रेणीतून मुस्लिमांना देण्यात आलेले आरक्षण संपुष्टात आणण्याचा निर्णय चुकीचा असल्याचा युक्तिवाद यापूर्वी याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील दुष्यंत दवे, कपिल सिब्बल, गोपाल शंकर यांनी केला होता. कुठलाही अभ्यास न करता, आकडेवारी लक्षात न घेता अचानक मुस्लिमांचे आरक्षण रद्द करण्यात आल्याचा दावा याचिकाकर्त्यांकडून करण्यात आला आहे. अनेक अहवालांनुसार, वोक्कलिंग तसेच लिंगायत समाजापेक्षाही मुस्लिमांची अवस्था बिकट असल्याचा दावा वकिलांकडून करण्यात आला होता.

पुढारी पा.न. १

# कर्नाटकात तूर्त नवे मुस्लिम आरक्षण लागू होणार नाही

## सर्वोच्च न्यायालय; २५ जुलैला पुढील सुनावणी



**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

नवे आरक्षण धोरण कर्नाटकमध्ये तूर्त लागू होणार नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी स्पष्ट केले. राज्यातील मुस्लिमांचे चार टक्के आरक्षण संपुष्टात आणण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावर न्यायालयाने सुनावणी घेतली. सध्या नवीन धोरणाच्या आधारावर नोकरी अथवा प्रवेश न देण्याचा न्यायालयाचा अंतरिम आदेश जारी राहील. यापूर्वी न्यायालयाने कर्नाटक सरकारचा मुस्लिमांचे आरक्षण संपुष्टात आणण्याचा निर्णय ९ मेपर्यंत लागू होणार नसल्याचे स्पष्ट केले होते.

कर्नाटक सरकारने उत्तर दाखल करण्यासाठी वेळ मागून घेतल्याने याप्रकरणी आता २५ जुलैला सुनावणी घेण्यात येईल. यापूर्वी २५ एप्रिलला ९ मेपर्यंत सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. पुढील तारखेपर्यंत /...८

CamScanner

Scanned with CamScanner

दि. १०/०५/२०२३

सामना पा.न. १

## पोलीस कोठडीत १५ मेपर्यंत वाढ

# कुरुलकर ई-मेलमार्फत पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणांच्या संपर्कात होते



### देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर प्रकरण; सखोल तपास गरजेचा – कोर्ट

पुणे, दि. ९ (प्रतिनिधी) – संरक्षणविषयक अत्यंत संवेदनशील आणि गोपनीय माहिती पाकिस्तानला पुरविल्याप्रकरणी 'एटीएस'ने अटक केलेले 'डीआरडीओ'चे संचालक डॉ. प्रदीप कुरुलकर हे ई-मेलद्वारे पाकिस्तानमधील गुप्तचर यंत्रणांच्या संपर्कात होते. तसेच पाकमधून आलेल्या ई-मेलला ते रिस्पॉन्सही देत होते. त्यांनी संरक्षणविषयक काही फोटो शेअर केल्याची धक्कादायक माहिती एटीएसच्या तपासात उघडकीस आली आहे. दरम्यान, हा प्रकार अत्यंत गंभीर असून, देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने या प्रकरणाचा सखोल तपास होणे गरजेचे आहे, असे नमूद करतानाच विशेष न्यायाधीश एस. आर. नावंदर यांनी कुरुलकर यांच्या पोलीस कोठडीत १५ मेपर्यंत वाढ केली. पान ५

### मोबाईल, लॅपटॉपमधील काही डेटा केला डिलीट

डॉ. कुरुलकर यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने जानेवारी महिन्यात त्यांचा लॅपटॉप, मोबाईल जप्त करण्यात आला होता. त्याचा फॉरेन्सिक रिपोर्ट मंगळवारी न्यायालयात दाखल करण्यात आला. या डिव्हाइसमधील काही डेटा त्यांनी डिलीट केल्याचे रिमांड रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आले आहे. हा डिलिट केलेला डेटा काय होता याचा तपास एटीएस करणार आहे.

### *सहा देशांना भेटी*

*डॉ. कुरुलकर यांनी पाकिस्तानातून आलेल्या काही मेलना प्रतिसाद दिला असल्याचे गुगलच्या अहवालावरून स्पष्ट झाले आहे. डॉ. कुरुलकर यांनी शासकीय पासपोर्टवर सहा देशांना भेटी दिल्या आहेत. या प्रकरणाचा तपास सुरू असताना काही नावे पुढे आली असल्याची माहिती 'एटीएस'च्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुजाता तानवडे यांनी न्यायालयाला दिली.*

**संघाचे चिंतन! संस्कारी कुरुलकर 'हॅनी ट्रॅप'मध्ये का अडकले?**

वृत्त पान ५

CS CamScanner

Scanned with CamScanner

पुढारी

# महिलांचा आवाज काढून लुटणारे दोन भामटे जेरबंद

## मुंबई, नवी मुंबई, मिरा-भाईंदर, कोल्हापूर, पुणे, गुजरातमधील १९ व्यापाऱ्यांची लूट

**ठाणे : पुढारी डेस्क**

हुबेहूब महिलेचा आवाज काढून ज्वेलर्स, जनरल स्टोर्स, मेडिकल दुकानदारांची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या दोन जणांना जेरबंद करण्यात आले आहे. मनीष आंबेकर, अन्वर अली कादीर शेख अशी आरोपींची नावे आहेत. हे आरोपी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस दलाच्या काशिमीरा गुन्हे शाखेच्या हाती लागलेल्या या आरोपींनी मुंबई, नवी मुंबई, मिरा-भाईंदर, वापी, पुणे, कोल्हापूर, गुजरातमध्ये १९ व्यापाऱ्यांना गंडवल्याची कबुली दिल्याचे काशिमीरा गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सांगितले.

नवघर परिसरात एक नामांकित रुग्णालय आहे. या रुग्णालयाच्या डॉक्टराची पत्नी बोलत असल्याचे सांगून महिलेने श्रीराम ज्वेलर्सच्या



मालकाला ४ तोळ्यांच्या बांगड्याची ऑर्डर दिली. या ऑर्डरसाठी ॲडवान्स २ लाख रुपये व रुग्णालयासाठी २ लाख रुपये सुटे घेऊन दुकानातील कामगाराला रुग्णालयात पाठवण्यास सांगितले. नामांकित डॉक्टरची पत्नी समजून ज्वेलर्स मालकाने कामगाराला २ लाख रुपये सुटे घेऊन पाठवले. दरम्यान, रुग्णालयात कामगार येताच आरोपींनी त्याला गाठले. त्याच्याकडील २ लाखांची रोकड घेतली आणि डॉक्टर पत्नीने दिलेल्या बांगड्यांची साईज घेऊन येण्यास सांगितले. २ लाखांचे सुटे रुपये देऊन कामगारा पुन्हा दुकानात गेला असता फसवणूक झाल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास काशिमीरा गुन्हे शाखेचे पथक करू लागले. तपासादरम्यान आरोपींची माहिती प्राप्त झाली. सदर माहितीच्या आधारे गुन्हे शाखेचे उपायुक्त अविनाश अंबुरे, एसीपी अमोल मांडवे, सपोनि कैलास टोकले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पुष्पराज सुर्वे, सपोउपनि संदीप शिंदे, किशोर वाडिले, संजय पाटील, संजय शिंदे यांच्यासह अन्य पथकाने सापळा लावून आरोपी मनीष आंबेकर, अन्वर अली कादीर शेख यांना बेड्या ठोकल्या.

### गुन्ह्यांसाठी निवडायचे नामांकित रुग्णालय

व्यापाऱ्यांना लुटण्यासाठी आरोपींनी नामांकित रुग्णालयाचा आधार घेऊन नवघर, भाईंदर, नयानगर, आचोळे, दादर येथील व्यापाऱ्यांना लुटल्याचे उघडकीस आले. अशाच प्रकारे या आरोपींनी पुण्यातील लोणीकंद, स्वारगेट रक्तपेढी, नवी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज पतपेढी, खांदेश्वर येथील मेडिकल, मराठा ज्वेलर्स, मुंबईनाका-नाशिक येथील चितळे स्वीट, कळंबोलीतील राधीका ज्वेलर्स, पनवेल ज्वेलर्स, कोल्हापूर-शाहुपुरतील वेनलेस मेडिकल, मिरा रोडमधील शबनम ज्वेलर्स आणि गुजरात, वापी, वलसाड, सूरत सिटी आदी ठिकाणी लुटल्याचे उघडकीस आले आहे.

Thane Edition
May 10, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

Scanned with CamScanner